नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २९८ Issue - 298 | वार शुक्रवार दि. २० मार्च २०२६ Blow- Friday Date 20 March 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राज्यात अवकाळीचा कहर

## धाराशिव, जालना, सांगलीत गारपिटीचा तडाखा; शेतकरी हवालदिल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आज सर्वत्र गुढीपाडव्याचा उत्साह, नववर्षाचे स्वागत आणि मांगल्याचे वातावरण असतानाच महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांना अवकाळी पावसाने झोडपून काढले आहे. धाराशिव, जालना, वाशिम, नांदेड आणि सांगली जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह झालेल्या गारपिटीने शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेला घास हिरावून घेतला आहे. सोसाट्याचा वारा आणि गारांच्या वर्षावामुळे रब्बी पिकांसह फळबागांचे अतोनात नुकसान झाले असून, सणाच्या दिवशीच बळीराजावर चिंतेचे मोठे संकट ओढावले आहे.

धाराशिव: वाशी तालुक्यात गारांचा वर्षाव

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्याला आज सायंकाळी ६ च्या सुमारास अवकाळी पावसाने झोडपून काढले. इंदापूर, खानापूर, तेरखेडा, वाशी, बोरी आणि गोलेगाव परिसरात वादळी वाऱ्यासह जोरदार गारपीट झाली. यामध्ये उभी ज्वारी, गहू, हरभरा आणि काढणीस आलेला कांदा भूईसपाट झाला आहे. याशिवाय आंबा आणि द्राक्ष बागायतदारांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, कलिंगड आणि पालेभाज्याही गारांच्या माऱ्याने उद्ध्वस्त झाल्या आहेत.

जालना: शहरासह ग्रामीण भागात जनजीवन विस्कळीत

जालना जिल्ह्यात हवामान विभागाने वर्तवलेला अंदाज खरा ठरला. परतूर, मंठा, बदनापूर आणि जालना शहरात सायंकाळी ५ च्या सुमारास विजांच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या पावसामुळे बाजारपेठेत नागरिकांची धावपळ उडाली. अनेक रस्त्यांवर पाणी साचले असून झोपडपट्टी भागातील नागरिकांचे संसारोपयोगी साहित्य भिजल्याने त्यांचे हाल झाले. गहू, हरभरा, मका यासह मोसंबी आणि केळीच्या बागांना या पावसाचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.

वाशिम आणि अर्धापूर: पिकांचे कंबरडे मोडले

वाशिम जिल्ह्यात दुपारच्या सुमारास झालेल्या पावसाने वातावरणात गारवा आणला असला, तरी शेतकऱ्यांसाठी हा पाऊस 'काळ' ठरला आहे. येथे बिजवाई कांदा पिकाचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. काढणीला आलेला गहू आणि हरभरा गारांच्या माऱ्यामुळे जमिनीदोस्त झाला आहे.



अर्धापूर (नांदेड): अर्धापूर तालुक्यातील चाबरा शिवारात वादळी वाऱ्यासह गारपीट झाली. येथे एका सार्वजनिक कार्यक्रमात पावसाने हजेरी लावल्याने पाहुण्यांची मोठी तारांबळ उडाली. हळद, गहू आणि हरभरा पिकांचे येथे मोठे नुकसान झाले आहे.

सांगली: पळशीच्या द्राक्ष बागायतदारांना तडाखा

सांगलीच्या खानापूर घाटमाथ्यावर निसर्गाचा कोप पाहायला मिळाला. भिवघाट, हिवरे आणि पळशी परिसरात भीषण गारपीट झाली. पळशी हे निर्यातक्षम द्राक्ष उत्पादनासाठी ओळखले जाते. छाटणीसाठी तयार असलेल्या आणि काढणीवर आलेल्या द्राक्ष मण्यांना गारांमुळे तडे गेल्याने बागायतदारांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

बळीराजाची मागणी: पंचनामे तातडीने करा- निसर्गाच्या या अवकृपेमुळे सणासुदीच्या काळात शेतकरी वर्ग पूर्णपणे खचला आहे. दिवस-रात्र कष्ट करून पिकवलेली पिके डोळ्यादेखत मातीमोल होताना पाहून आता जगायचे कसे? असा सवाल शेतकरी विचारत आहेत. प्रशासनाने या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना तात्काळ मदत जाहीर करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

# भारतासह जगावर ऊर्जासंकट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

**इराण-इस्त्रायल युद्धामध्ये टॉपचे दोन गॅस केंद्र भक्ष्यस्थानी**

नवी दिल्ली: आखाती देशात पेटलेल्या युद्धामुळे जगावर ऊर्जासंकट ओढावल्याचं चित्र आहे. गेल्या २० दिवसांपासून सुरु असलेली ही लढाई फक्त क्षेपणास्त्रं आणि ड्रोनपुरती मर्यादित राहिलेली नाही, तर ती थेट ऊर्जा स्त्रोतांपर्यंत पोहोचली आहे. पुढील १३ वर्षे संपूर्ण जगाची गरज भागवू शकेल, एवढा गॅस ज्या केंद्रांवर उपलब्ध आहे तेच दोन केंद्रं आगीच्या भक्ष्यस्थानी पडली आहेत.

इराणच्या दक्षिण भागात असलेल्या जगातील सर्वात मोठ्या गॅस साठ्यांपैकी एक असलेल्या साऊथ पार्स भागात इस्रायलानं जोरदार हल्ला केला. याला उत्तर म्हणून इराणनं कतारच्या रास लफान भागात प्रतिहल्ले केले. रास लफान भागात यामुळे मोठी आग लागली, मात्र तात्काळ ही आग नियंत्रणात आणण्यात आली. कतारचा हा भाग नॉर्थ डोम म्हणून प्रसिद्ध आहे. गॅस पुरवठ्यासाठी हे दोन्ही प्रदेश अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यामुळे एकमेकांच्या ऊर्जा क्षेत्रातील माऱ्यांमुळे युद्ध गंभीर वळणावर येऊन ठेपल्याचं दिसतंय. भारत तेलाच्या आयातीबाबतीत मोठ्या प्रमाणावर कतारवर अवलंबून आहे. एलएनजीच्या एकूण गरजेपैकी भारत ३८ ते ४० टक्के गॅस कतारमधून आयात करतो. कतारच्या रास लफान भागातून प्रामुख्यानं या गॅसचा पुरवठा होतो. त्यामुळे कतारमध्ये झालेल्या हल्ल्यामुळे भारताचंही टेन्शन वाढल्याचं दिसतंय. दरम्यान, या युद्धाच्या झळा आता संपूर्ण जगाला बसण्यास सुरूवात झाली आहे. कच्च्या तेलाच्या किमती २०० डॉलर्स प्रति बॅरलवर जाण्याची शक्यता आहे. बंद झालेली होमुझची सामुद्रधुनी आणि आता पार्स क्षेत्रावरील हल्ल्यामुळे तेलाच्या किमती कमालीच्या भडकण्याची भीती आहे. तज्ज्ञांनीही तसा अंदाज व्यक्त केला आहे. युद्ध सुरू होऊन तीन आठवडे झाले आहेत, मात्र हे युद्ध लवकर संपण्याची कोणतीही शक्यता दिसत नाही.

# भविष्यात सत्ता हातात घेणार म्हणजे घेणार, पाडवा मेळाव्यात राज ठाकरेंचं वक्तव्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबईः गुढीपाडवा आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा मेळावा हे आता एक समीकरण बनले आहे. मनसेच्या स्थापनेला १९ वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर, आज शिवतीर्थावर (शिवाजी पार्क) मनसेचा भव्य पाडवा मेळावा पार पडला. रायगडच्या पायथ्याशी 'साध्या' पद्धतीने वर्धापन दिन साजरा केल्यानंतर, राज ठाकरे मुंबईत काय तोफ डागणार, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले होते. अखेर राज ठाकरे यांनी आपल्या खास शैलीत राजकीय फटकेबाजी केली आहे.

राज जमलेल्या माझ्या तमाम मराठी बांधवांनो, भगिनींनो आणि मातांनो, सर्वप्रथम मी आपणा सर्वांना गुढीपाडव्याच्या आणि मराठी नववर्षाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देतो. ९ मार्च २००६ ला आपला पक्ष स्थापन झाला आणि १९ मार्च २००६ ला आपली पहिली जाहीर सभा याच शिवतीर्थावर झाली. आज पक्षाला २० वर्षे पूर्ण झाली आहेत. आनंदाची आणि भाग्याची गोष्ट अशी की, २० वर्षांनंतर बरोबर १९ मार्चलाच गुढीपाडवा आला आहे, मी याला एक शुभ संकेतच मानतो. निवडणुका आल्या आणि गेल्या, रणशिंग फुंकले गेले, हे सर्व झाले पण आपण जे उभे आहोत, ते महाराष्ट्रासाठी आहोत हे लक्षात ठेवा., मी आता जे काही बोलतोय, ते तुमच्या टाळ्या मिळवण्यासाठी बोलत नाहीये. महाराष्ट्राचे गतवैभव पुन्हा प्राप्त करून देण्यासाठी मी जो शब्द दिला आहे, त्यासाठी भविष्यात आपण सत्ता हाती घेणारच, हा माझा आत्मविश्वास आहे.

# महाराष्ट्रात गेमिंग, क्रिएटर इकॉनॉमी आणि पायाभूत सुविधा उभारण्यावर भर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महाराष्ट्रात गेमिंग, क्रिएटर इकॉनॉमी, शिक्षण आणि डिजिटल पायाभूत सुविधा उभारण्यासाठी शासन सक्षम वातावरण निर्माण करत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना काही कंटेंट क्रिएटर्सने विचारलेल्या प्रश्नांना त्यांच्या खास शैलीत उत्तरे दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज मुंबईच्या एमएमआरडीए ग्राऊंड, बीकेसी येथे जेन ओ : पिक्सल ण्ड प्ले ण्ड ग्लोबल इस्पोर्ट गेम्स या कार्यक्रमाचे उद्धाटन करण्यात आले. यावेळी त्यांच्यासोबत पर्यटन विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, मुख्यमंत्र्यांचे सल्लागार कौस्तुभ धवसे, जेन ओचे संस्थापक श्रीपाद अष्टेकर आणि ग्लोबल ई-स्पोर्टस् फेडरेशनचे अध्यक्ष पॉल फॉस्टर उपस्थित होते.

गेमिंग क्षेत्रातील करिअरविषयी विचारलेल्या प्रश्नावर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, माझ्या मुलींने गेमिंगमध्ये करिअर करायचे ठरवले, तर त्यांना १०० टक्के परवानगी आणि पूर्ण पाठिंबा असेल. कोणतेही क्षेत्र निवडले तरी मेहनत हीच यशाची गुरुकिल्ली असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री कार्यालयाचे २४७ लाईव्ह स्ट्रीमिंग करण्याबाबत विचारले असता मुख्यमंत्र्यांनी सांगितले केले की, मुख्यमंत्री ऑफिसद्वारे मोठे प्रकल्प आणि महत्त्वाचे निर्णय लोकांसमोर लाईव्ह प्लॅटफॉर्मवर मांडण्याचा प्रयत्न करू, असे त्यांनी नमूद केले.



कंटेंट क्रिएटर्सना भेडसावणाऱ्या 'व्ह्यूज टू व्हॅल्यू' या समस्येबाबत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, राज्य शासन क्रिएटर्स आणि ब्रँड्स यांच्यातील दरी कमी करण्यासाठी प्रयत्नशील आहे. अलीकडेच यूट्यूबचे सीईओ नील मोहन यांच्यासोबत चर्चा झाली असून, क्रिएटर्ससाठी मजबूत इकोसिस्टम तयार करण्यावर भर दिला जात आहे, असे त्यांनी सांगितले. तसेच एव्हीजीसी (तऋछ) धोरणाद्वारे क्रिएटर इकॉनॉमीला चालना दिली जात असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

विद्यार्थ्यांसाठी कंटेंट क्रिएटिव्ह क्षेत्रात औपचारिक शिक्षणाच्या संधी वाढवण्याबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी (खखउढ) स्थापन करण्यात आले असून, हब-अँड-स्पोक मॉडेलद्वारे प्रशिक्षण आणि इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करून दिले जाईल. त्यामुळे विद्यार्थ्यांना गेमिंग, ॲनिमेशन आणि व्हिज्युअल इफेक्ट्समध्ये करिअरची स्पष्ट दिशा मिळणार आहे.ग्रामीण भागातील इंटरनेट सुविधांबाबत त्यांनी सांगितले की, राज्यातील ४० हजार गावांपैकी सुमारे ७० टक्के गावांमध्ये फायबर नेटवर्क पोहोचले आहे. पुढील दोन ते तीन वर्षांत प्रत्येक गावात उच्चगती इंटरनेट उपलब्ध करून देण्याचा सरकारचा मानस आहे. त्यामुळे गेमर्सना 'लॅग-फ्री' अनुभव मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

**पुरवठा व्यवस्थेवर गंभीर परिणाम होण्याची भीती**

# इराणकडून सौदीच्या यानबू बंदरातील समरेफ रिफायनरीवर हवाई हल्ला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : सौदी अरेबियाच्या लाल समुद्र किनाऱ्यावर असलेल्या यानबू बंदरगाहातील सौदी अरामको आणि एक्सॉनमोबिल यांच्या संयुक्त उपक्रम 'समरेफ' रिफायनरीवर गुरुवारी (१९ मार्च) हवाई हल्ला झाला. वृत्तानुसार, या हल्ल्याचा परिणाम मर्यादित राहिला असून रिफायनरीचे कोणतेही मोठे नुकसान झालेले नाही.

हा हल्ला इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स (आयआरजीसी) ने सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिरात आणि कतारमधील अनेक ऊर्जा केंद्रे रिकामी करण्याचा इशारा दिल्यानंतर काही वेळातच झाला. या यादीत समरेफ रिफायनरीचाही समावेश होता. अमेरिका-इस्रायलने इराणच्या ऊर्जा सुविधांवर केलेल्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून हा हल्ला झाल्याचे मानले जात आहे.यानबू बंदरगाह सध्या खाडी देशांमधून कच्च्या तेलाच्या निर्यातीसाठी उरलेला एकमेव प्रमुख मार्ग आहे, कारण मागील महिन्यात युद्ध सुरू झाल्यानंतर इराणने होर्मुज सामुद्रधुनी बंद केली आहे. जगातील सुमारे पाचव्या भागाच्या तेलपुरवठ्यासाठी हा अरुंद मार्ग अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. याआधी संयुक्त अरब अमिरातीतील फुजैराह बंदरही हल्ल्यांमुळे प्रभावित झाले असून त्यामुळे जागतिक ऊर्जा संकट अधिक तीव्र झाले आहे.



इराक आणि इराणसह अनेक आखाती देश मिळून जगातील सुमारे ३१ टक्के तेल आणि ८ ते १७ टक्के नैसर्गिक वायू उत्पादन करतात. कतारमधील रास लफ्फान एलएनजी प्रकल्पावर झालेल्या इराणी क्षेपणास्त्र हल्ल्यामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याची माहिती आहे. समरेफ रिफायनरीवरील हल्ल्यामुळे तेल बाजारातील अस्थिरता आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सौदी अरेबिया आणि प्रादेशिक देश ऊर्जा सुरक्षेला प्राधान्य देत असले तरी इराणच्या प्रत्युत्तरात्मक हल्ल्यांमुळे परिस्थिती तणावपूर्णच राहिली आहे. हल्ल्यांची मालिका सुरू राहिल्यास जागतिक तेलाच्या किमतींमध्ये आणखी वाढ होऊ शकते आणि पुरवठा व्यवस्थेवर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# होर्मुझवरील तणावाच्या पार्श्वभूमीवर मोदींची कुवेतच्या युवराजांशी चर्चा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कुवेतचे युवराज शेख सबाह अल-खालिद अल-हमद अल-मुबारक अल-सबाह यांच्याशी दूरध्वनीवरून महत्त्वपूर्ण चर्चा केली. या संवादात पश्चिम आशियातील बदलत्या परिस्थिती, प्रादेशिक तणाव आणि होर्मुझ सामुद्रधुनीतील सुरक्षेवर सविस्तर विचारविनिमय झाला.

या वेळी पंतप्रधानांनी ईदच्या निमित्ताने आगाऊ शुभेच्छा देत दोन्ही देशांतील मैत्रीपूर्ण संबंध अधिक दृढ करण्याची भावना व्यक्त केली. दोन्ही नेत्यांनी अलीकडील घडामोडींवर चिंता व्यक्त करत प्रदेशात शांतता आणि स्थैर्य राखण्यासाठी सातत्यपूर्ण राजनैतिक संवादाची गरज अधोरेखित केली.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, कुवेतच्या सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडतेवरील हल्ल्यांचा भारत तीव्र निषेध करतो. तसेच होर्मुझ सामुद्रधुनीतून सुरक्षित आणि अखंड जहाजवाहतूक सुनिश्चित करणे ही सर्वोच्च प्राथमिकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कुवेतमध्ये राहणाऱ्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षेसाठी दिलेल्या सहकार्याबद्दल पंतप्रधानांनी युवराजांचे आभार मानले. मोठ्या संख्येने भारतीय नागरिक कुवेतमध्ये वास्तव्यास असल्याने त्यांचे रक्षण करणे भारतासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, यापूर्वी पंतप्रधान मोदी यांनी संयुक्त अरब अमिरातीचे (यूएई) राष्ट्रपती शेख मोहम्मद बिन जायद अल-नहयान यांच्याशीही दूरध्वनीवरून संवाद साधत पश्चिम आशियातील परिस्थितीवर चर्चा केली होती. त्यांनी यूएईवरील हल्ल्यांचा निषेध नोंदवत निरपराध नागरिकांच्या मृत्यूबद्दल आणि नागरी पायाभूत सुविधांच्या नुकसानीबद्दल चिंता व्यक्त केली.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### शेतकऱ्यांना फटका

आज सर्वत्र गुढीपाडव्याचा उत्साह, नववर्षाचे स्वागत आणि मांगल्याचे वातावरण असतानाच महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांना अवकाळी पावसाने झोडपून काढले आहे. धाराशिव, जालना, वाशिम, नांदेड आणि सांगली जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह झालेल्या गारपिटीने शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेला घास हिरावून घेतला आहे. सोसाट्याचा वारा आणि गारांच्या वर्षावामुळे रब्बी पिकांसह फळबागांचे अतोनात नुकसान झाले असून, सणाच्या दिवशीच बळीराजावर चिंतेचे मोठे संकट ओढावले आहे. धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्याला आज सायंकाळी ६ च्या सुमारास अवकाळी पावसाने झोडपून काढले. इंदापूर, खानापूर, तेरखेडा, वाशी, बोरी आणि गोलेगाव परिसरात वादळी वाऱ्यासह जोरदार गारपीट झाली. यामध्ये उभी ज्वारी, गहू, हरभरा आणि काढणीस आलेला कांदा भूईसपाट झाला आहे. याशिवाय आंबा आणि द्राक्ष बागायतदारांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, कलिंगड आणि पालेभाज्याही गारांच्या माऱ्याने उद्ध्वस्त झाल्या आहेत. जालना जिल्ह्यात हवामान विभागाने वर्तवलेला अंदाज खरा ठरला. परतूर, मंठा, बदनापूर आणि जालना शहरात सायंकाळी ५ च्या सुमारास विजांच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावली. अचानक आलेल्या पावसामुळे बाजारपेठेत नागरिकांची धावपळ उडाली. अनेक रस्त्यांवर पाणी साचले असून झोपडपट्टी भागातील नागरिकांचे संसारोपयोगी साहित्य भिजल्याने त्यांचे हाल झाले. गहू, हरभरा, मका यासह मोसंबी आणि केळीच्या बागांना या पावसाचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. वाशिम जिल्ह्यात दुपारच्या सुमारास झालेल्या पावसाने वातावरणात गारवा आणला असला, तरी शेतकऱ्यांसाठी हा पाऊस 'काळ' ठरला आहे. येथे बिजवाई कांदा पिकाचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. काढणीला आलेला गहू आणि हरभरा गारांच्या माऱ्यामुळे जमिनीदोस्त झाला आहे. सांगलीच्या खानापूर घाटमाथ्यावर निसर्गाचा कोप पाहायला मिळाला. भिवघाट, हिवरे आणि पळशी परिसरात भीषण गारपीट झाली. छाटणीसाठी तयार असलेल्या आणि काढणीवर आलेल्या द्राक्ष मण्यांना गारांमुळे तडे गेल्याने बागायतदारांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

# जातीनिहाय जनगणनेमुळे समतेचा मार्ग सुकर होण्यास मदत होईल : पद्मश्री डॉ.मिलिंद कांबळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी जातींचे भयाण वास्तव मांडून जाती निर्मूलन झाले पाहिजे, असे आग्रहाने सांगितले होते. दलित समाजाचा विकास करण्यासाठी जात वास्तव समजून घेतले पाहिजे. त्यासाठी प्रत्येक जातींची नेमकी लोकसंख्या जात जनगणनेच्या माध्यमातून पुढे येईल. त्या आधारे त्यांच्यासाठी कल्याणकारी योजना निरपेक्षपणे राबविण्यात आल्या तर हळूहळू जात संपून जाईल आणि समतेचा मार्ग सुकर होईल, असे प्रतिपादन पद्मश्री डॉ मिलिंद कांबळे यांनी केले. चवदार तळे सत्याग्रहाला ९९ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासन व डॉ बाबासाहेब आंबेडकर अध्यासन यांच्या संयुक्त विद्यमाने 'जातीनिहाय जनगणना – सामाजिक न्यायाच्या दिशेने' या विषयावरील चर्चासत्रात अध्यक्षस्थानावरून पद्मश्री डॉ मिलिंद कांबळे बोलत होते.



यावेळी मंचावर प्र-कुलगुरु डॉ. पराग काळकर तसेच चर्चासत्रातील वक्ते म्हणून व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ.देविदास वायदंडे, सौ.बागेश्री मंठाळकर, अधिसभा सदस्य प्रा.डॉ.हर्ष जगझाप, ड.क्षितीज गायकवाड, प्रा.डॉ.सूर्यकांत गायकवाड, प्रा.विनायक लष्कर आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख डॉ.सुधाकर बोकेफोडे, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासनाचे प्रमुख डॉ सुनील भंडगे उपस्थित होते.

चर्चासत्रात बोलताना प्राचार्य डॉ.देविदास वायदंडे म्हणाले, सार्वत्रिक शिक्षणाने समाजात जागृती निर्माण झाली आहे. आता आर्थिक समानतेची आवश्यकता आहे. आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी, रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी जातीनिहाय जनगणना होणे अत्यावश्यक आहे.. विद्यापीठाच्या स्पर्धा परीक्षा केंद्रातील प्रा.डॉ.सूर्यकांत गायकवाड म्हणाले, आपल्याला समान संधीचा आदर्श छत्रपती शिवाजी महाराजांनी घालून दिला. महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराजांनीही तोच आदर्श चालवला. आता संविधानामुळे समान संधी उपलब्ध करण्यासाठी जातीनिहाय जनगणना होणे गरजेचे आहे. आंबेडकरी चळवळीतील अभ्यासू कार्यकर्ते ड.क्षितीज गायकवाड म्हणाले,आजही काही उपेक्षित समाज घटक भारताचे नागरिक म्हणून गणले गेले नाहीत , त्यांची कुठेच नोंद नाही. त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याची जात जनगणनेमुळे चांगली संधी आली आहे. पर्यायाने त्यांच्यासाठीच्या योजनांचा विचारही केंद्र सरकारने करायला पाहिजे , अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली . विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्य सौ.बागेश्री मंठाळकर यांनी बोलताना सांगितले की, संविधानामुळे महिलांचा सर्वच क्षेत्रांतील सहभाग वाढला आहे. आता डिजिटल जनगणना होणार आहे, मोठ्या प्रमाणात महिलांची संख्या समोर येईल, त्यांची ध्येयधोरणे ठरवताना त्यांना गृहीत न धरता विश्वासात घेतले पाहिजे. ज्यांचा आरक्षणातून विकास झाला आहे. त्यांनी आता ते सोडले पाहिजे. त्याचा उपयोग अन्य जातींना व्हायला मदत होईल. 'आहे रे आणि नाही रे' मधील संघर्ष थांबवण्यासाठी जात गणना मोलाची आहे. राज्यशास्त्राचे प्रा.डॉ. हर्ष जगझाप म्हणाले की, सामाजिक न्यायाचे तत्त्व निरपेक्षपणे अंगिकारले पाहिजे. आता पक्षांच्या वळचणीला गेलेला समाज नकोय . संपूर्ण समाजाचे लोकशाहीकरण होण्यासाठी जातीनिहाय जनगणना मैलाचा दगड ठरेल.

भटक्या विमुक्त जमातींचे अभ्यासक प्रा.विनायक लष्कर म्हणाले, इंग्रजांनी भटक्या विमुक्त जमातींचे अतोनात हाल केले. स्वातंत्र्यानंतर मंडल आयोग, काकासाहेब कालेलकर, बापट, बाळकृष्ण रेणके, भिकुजी इदाते इ. आयोगांनी भटक्या विमुक्त जमातींचा गांभीर्याने विचार केला. पण काहीच घडलं नाही.आता होणाऱ्या जात गणनेमुळे भटक्या विमुक्त जमातींच्या पालांमध्ये प्रकाशाची किरणे पोहोचतील, अशी आशा करूया.. चर्चासत्रातील सर्व वक्त्यांचा सत्कार प्र-कुलगुरु डॉ. पराग काळकर यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक डॉ.सुनील भंडगे यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ.सुधाकर बोकेफोडे यांनी केले. कार्यक्रमाला शाहीर हेमंत मावळे, तत्वज्ञान विभाग प्रमुख डॉ.हरिष नवले, प्रा.डॉ. विजयकुमार रोडे, प्रा.डॉ.अनिल पवळ, प्रा.कोळेकर, अनिल मोरे, राजेश रासगे, राहूल ससाणे तसेच विविध विभागांचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चालु हंगामातील अंबा व बागांचे वातावरणामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ भरीव मदत देण्याची मागणी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी/सुधाकर रणदिवे : सन २०२६ चालु हंगामात आंबा बागांचे व आंबा पिकांचे वातावरणातील बदलामुळे मोठे नुकसान झाले आहे या पिकांचे नुकसानीचे पंचनामे करुन शेतकऱ्यांना तात्काळ भरीव मदत मिळवी अशी मागणी कळंब तालुक्यातील शेतकऱ्यांनी गणेश शिंदे उपविभागीय अधिकारी कळंब व तालुका कृषी अधिकारी भागवत सरडे यांना देण्यात आलेल्या निवेदनात केली आहे या निवेदनात सन २०२६ चालु

हंगामात आंबा पिकास खुप मोठ्या प्रमाणात मोहोर लागला होता, परंतु वातावरणातील अचानक झालेल्या बदलामुळे आंबा बागांचे मोहोर पुर्ण करपुन गेलेले आहेत.त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले असुन या संकटापासून बचावलेला अंबा ही तीव्र उष्णतेमुळे गळून पडत आहे, शिल्लक राहिलेले आंबा पिकांचे उत्पादन येण्याचे शक्यता फार कमी आहे. कळंब तालुक्यात आंबा उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठी असून तालुक्यात २५० हेक्टर वर आंबा पिक घेतले जाते त्यामुळे आपण आपल्या क्षेत्रीय कर्मचाऱ्यांना सदरील बागांचे व पंचनामे करण्याचे आदेश देवून आम्हाला झालेल्या नुकसानीची भरपाई देण्यात यावी आंबा पिकाच्या नुकसानी संदर्भात कोकण विभागात जो निकष आहे, तो निकष मराठवाड्यातील आंबा पीकासाठी लावण्यात यावा या वर्षी या गावामध्ये पाण्याच्या अवर्षणामुळे वृक्ष / झाडे जगवणे कठिण झालेले

आहे तेथील शेतकऱ्यांचे बोअरवेल बंद पडलेले आहेत. त्यामुळे पाण्याची कमतरता भासत आहे.

तरी आम्हाला आपणामार्फत पाण्याच्या टँकरची सोय दोन ते तीन महिनेपर्यंत करुन देण्यात यावे अशी मागणी या निवेदनात समस्त शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात आली आहे या निवेदनावर तांदुळवाडी ग्रामपंचायतचे सरपंच प्रणित डिकले, प्रताप डिकले, भागवत शिंदे, अमर चोंदे,मनोज थोरात, लोमटे तात्या यांच्यासह शेतकऱ्यांच्या सह्या आहेत निवेदनाच्या प्रती

कृषीमंत्री महाराष्ट्र राज्य, मुंबई,पालकमंत्री,धाराशिव जिल्हाधिकारी साहेब, धाराशिव जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय धाराशिव, यांना देण्यात आल्या आहेत, निवेदन देण्यासाठी तालुक्यातील आंबा पिक उत्पादक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रमजान निमित्त बाशापीर यंग कमिटीकडून इफ्तार पार्टीचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


अक्कलकोट : तालुक्यातील सांगवी बु येथे बाशापिर यंग कमिटी यांच्याकडून रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर महमदखासीम शेख, अब्बास पटेल, जिलानी मुल्ला, तन्वीर शेख, यांच्या मार्गदर्शनाखाली इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध समाजातील नागरिक सहभागी झाले असून यावेळी हिंदू-मुस्लिम ऐक्याचे सुंदर प्रतीक पाहायला मिळाले.



यंकाळी रोजा सोडण्याच्या वेळी सर्व उपस्थितांनी एकत्र प्रार्थना करत जगभर सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण होणारे संकट टळावे, तसेच देशात शांतता व सलोखा कायम राहावा यासाठी अल्लाहकडे दुआ मागितली. त्यानंतर उपस्थितांनी एकमेकांना रमजानच्या शुभेच्छा देत बंधुभावाचा संदेश दिला.

या कार्यक्रमामुळे सामाजिक ऐक्य, परस्पर आदर आणि सौहार्द यांचा संदेश समाजात पोहोचल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी इम्रान मुल्ला, मोहसीन जामदार, सद्दाम मुरशेद, अल्बक्ष मुल्ला, दाऊद मुल्ला, गौसपाक पठाण, इकबाल पठाण, आलम मुल्ला, फरहान पटेल, तोईद मुल्ला, सय्यद मुल्ला, अकबर शेख, दानिश पठाण, अल्लू शेख, इरफान शेख, नुरदिन पठाण, तुराब पठाण, महामूद बिचकुते, सुफियान बिचकुते आदींनी विशेष सहकार्य केले. सर्व धर्मीय नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाड क्रांतीभूमीला वंदन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवाने जगाला समतेचा संदेश दिला. सर्व समान आहेत हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी महाडच्या चवदार तळ्यावर २० मार्च १९२७ रोजी अभूतपूर्व सत्याग्रह केला. शतकीय वर्षात पदार्पण करणाऱ्या या सत्याग्रहाचा स्मृतिगंध युगानुयुगे अखंड दरवळत राहावा यासाठी हा लेखप्रपंच.

त्या दुपारी अस्पृश्यांनी चवदार तळे चौफेर घेरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सहकारी आणि दलित बांधव स्पृश्यांचे तळे जणू ताब्यात घेऊन जलस्पर्श करणार. अस्पृश्यांचे दीन चेहरे त्या स्वच्छ, थंडगार पाण्याकडे आशाळभूतपणे लागलेले... डॉ. बाबासाहेब आंबेडकर तळ्याच्या एक एक पायऱ्या उतरू लागले. त्यांच्या मागोमाग शिस्तबद्ध रांगा करून दलित बांधवही तळ्याच्या पायऱ्या उतरत होते. काही क्षणातच इतिहासाचे सुवर्ण पान लिहिले जाणार. समोरचे पाणीही या महामानवाच्या स्पर्शासाठी आसुसलेले. बाबासाहेबांनी हळुवारपणे पाण्याला स्पर्श करून ओंजळभर पाणी हाती घेतले. डोळेभरून पाणी क्षणभर पाहिले आणि प्यायला लागले. त्यांच्यासह अन्य बांधवही ओंजळ भरभरून पाणी प्यायला लागले. तळ्यातले पाणी आणि डोळ्यातले पाणी क्षणात एकजीव झाले. हजारो वर्षांत जे घडू शकले नाही ते इथे घडल

# लक्ष्मीबाईंच्या अश्रूंमधून उभा राहिला रयतचा वटवृक्ष : प्रा. पोपट काटकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : स्त्रियांच्या अश्रूंमध्ये परिवर्तनाची प्रचंड ताकद असते; सीतेच्या अश्रूंनी रामायण आणि द्रौपदीच्या अश्रूंनी महाभारत घडले, त्याचप्रमाणे लक्ष्मी वहिनींच्या अश्रूंमधून रयत शिक्षण संस्थेचा विशाल वटवृक्ष उभा राहिला. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी समाजातील अज्ञान, दारिद्र्य आणि विषमता दूर करण्यासाठी शिक्षणाची चळवळ उभारली; मात्र त्या चळवळीच्या पाठीशी लक्ष्मीबाईंचा निःस्वार्थ त्याग, माया आणि समर्पण यांची भक्कम साथ होती. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना आईसारखे प्रेम देणे, त्यांची उपासमार होऊ नये म्हणून स्वतःचे सुख त्यागणे, त्यांच्या जीवनात आत्मीयता निर्माण करणे ही कार्ये त्यांनी निष्ठेने पार पाडली. असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते प्रा. पोपट काटकर यांनी केले.

येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील स्वायत्त महाविद्यालयात समारंभ समिती, सांस्कृतिक विभाग आणि 'कमवा व शिका' योजना समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रयतमाउली सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या ९६ व्या पुण्यतिथीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ बी. टी. जाधव हे होते.

या कार्यक्रमाची सुरुवात रयतमाउली सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तसेच पाहुणे व अध्यक्षांचा परिचय सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. रमेश शिंदे यांनी करून दिला.

रयत माऊली सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील : जीवन व कार्य या विषयावर प्रमुख वक्ते प्रा. पोपट काटकर यांनी अत्यंत प्रभावी व प्रेरणादायी मनोगत व्यक्त केले. त्यांनी आपल्या भाषणात लक्ष्मीबाई पाटील यांच्या त्यागमय जीवनाचा सखोल ऊहापोह केला. ते पुढे म्हणाले की, लक्ष्मीबाई यांनी ८० तोळे सोन्याचा त्याग केला. हा त्याग केवळ आर्थिक नव्हता, तर तो सामाजिक बांधिलकीचा आणि मूल्यनिष्ठतेचा आदर्श होता. स्वाध्याय, स्वावलंबन, स्वाभिमान आणि स्वातंत्र्य या चतु:सूत्रीवर उभ्या असलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या उभारणीत लक्ष्मीबाईंच्या प्रेमळ त्यागाचे खत पडले असल्यामुळेच ही संस्था आज वटवृक्षासारखी फोफावली आहे, असे त्यांनी नमूद केले. लक्ष्मीबाईंच्या व्यक्तिमत्त्वातील सहिष्णुता आणि सर्वधर्मसमभाव यावर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, प्रारंभीच्या सनातनी संस्कारांवर मात करून त्यांनी सर्व समाजघटकांना आपलेसे केले. त्यांच्या आयुष्यातील त्याग, संयम आणि मातृत्वभाव या गुणांमुळेच त्यांना रयत माऊली ही उपाधी प्राप्त झाली. त्यांचे कार्य हिमालयापेक्षा उंच आणि





महासागरापेक्षा अथांग आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी रयत आणि माउली या संकल्पनांतील मूल्यांचा वेध घेत, लक्ष्मीबाईंच्या कार्याचा आदर्श आजच्या पिढीने आत्मसात करावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांचा शाल, पुस्तक व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कला विभागाचे उपप्राचार्य डॉ. भगवान नाईकनवरे, वाणिज्य विभागाचे उपप्राचार्य डॉ. सुशील शिंदे, कला विभागाचे अधिष्ठाता डॉ. समाधान माने, पदव्युत्तर विभागाचे अधिष्ठाता डॉ. बाळासाहेब बलवंत, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. अमर कांबळे, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य विठ्ठल काटकर, कार्यालयीन प्रमुख चौरंगनाथ वाघमारे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सारिका भांगे यांनी केले, तर समारोप प्रसंगी आभार समारंभ समितीचे चेअरमन डॉ. दत्तात्रय डांगे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. राजेंद्र मोरे, प्रा. हरिभजन कांबळे, प्रा. बापूसाहेब घोडके, प्रा. अंकुश घुले, प्रा. मोहिनी सावंत,अभिजीत जाधव, अमोल माने, भीमराव मेटकरी आदींनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील वरिष्ठ, कनिष्ठ व व्होकेशनल विभागातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पत्रकारांच्या मागण्यांवर शासनाशी सकारात्मक चर्चा; वाशीम अधिवेशनातील ठरावांचे मुख्यमंत्री व मंत्र्यांना निवेदन

## डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या पुढाकाराने पत्रकारांच्या मागण्यांचा मुद्दा थेट शासन दरबारी!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे वाशीम येथे नुकतेच २७ वे राज्य अधिवेशन संपन्न झाले होते. या अधिवेशनात पत्रकारांच्या हितासाठी विविध महत्त्वपूर्ण ठराव मंजूर करण्यात आले होते. त्या ठरावांचे सविस्तर निवेदन आज मुंबईतील विधान भवन येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच विविध विभागांच्या मंत्र्यांना सादर करण्यात आले.


राज्य सरचिटणीस तथा दैनिक 'समर्थ गांवकरी'चे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी मुख्यमंत्री व मंत्रिमंडळातील सदस्यांशी प्रत्यक्ष भेट घेऊन वाशीम अधिवेशनात मंजूर झालेल्या पत्रकारांच्या विविध मागण्यांबाबत सविस्तर चर्चा केली. यामध्ये पत्रकारांची सुरक्षा, मानधनवाढ, आरोग्य व अपघात विमा योजना, शासकीय सवलती तसेच पत्रकारांना भेडसावणाऱ्या विविध अडचणींचा समावेश होता. या सर्व मुद्द्यांवर शासनाने सकारात्मक भूमिका दर्शवली असून लवकरच ठोस निर्णय घेतले जातील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

या भेटीदरम्यान नूतन राज्यसभा खासदार रामराव वडकुते, अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, शिवेंद्रसिंहराजे भोसले, नरहरी झिरवाळ, शिक्षणमंत्री दादा भुसे, माजी मंत्री जितेंद्र आव्हाड, आदिती तटकरे, पंकजा मुंडे यांच्यासह संभाजीनगर शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे, आमदार हिरामण खोतकर, काशिनाथ दाते, विक्रमसिंह पाचपुते आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांचा 'समर्थ गांवकरी' दिनदर्शिका व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला. तसेच ज्येष्ठ पत्रकार वाणी यांच्यासह अनेक पत्रकार प्रतिनिधींनीही या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला.

या प्रसंगी संजय फुलसुंदर (महाव्यवस्थापक, दैनिक समर्थ गांवकरी), नयन डुंबरे (मंत्रालय संपर्कप्रमुख) तसेच विष्णू बुरे (मंत्रालय प्रतिनिधी) यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली.

एकूणच, वाशीम अधिवेशनात मांडण्यात आलेल्या पत्रकारांच्या विविध मागण्यांवर शासन स्तरावर सकारात्मक निर्णय होतील, अशी आशा या भेटीद्वारे व्यक्त करण्यात आली असून पत्रकारांच्या हक्कांसाठी हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे.





## गुढीपाडव्यानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आकर्षक फुलांची सजावट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

व्यवस्थापक संदेश भोसले/ पंढरपूर : चैत्र गुढीपाडवा व मराठी नववर्ष प्रारंभाच्या निमित्ताने आज (गुरुवार) श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व गाभाऱ्यात विविध रंगीबेरंगी फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली असून, त्यामुळे श्रींचा गाभारा अत्यंत मनमोहक व प्रसन्न दिसत आहे.

या सजावटीसाठी पिंक डेझी २५० बंडल, व्हाइट शेवंती ८०० काडी, गुलाब ५० बंडल, कामिनी ३०० बंडल, जिप्सो २० बंडल, जनाडो पत्ता ३० बंडल, आर्किड १० बंडल, झेंडू ७० किलो, शेवंती २० किलो, अस्टर २० किलो तसेच अशोक पाला २० माळांचा वापर करण्यात आल्याची माहिती मंदिर व्यवस्थापक संदेश भोसले यांनी दिली.

सदर फुलांची सजावट विठ्ठल भक्त नानासाहेब दिनकरराव पाचुंदकर पाटील (रा. रांजणगाव महागणपती) यांनी सेवाभावी तत्त्वावर मोफत केली असून, सजावटीचे काम डेकोरेटर्स श्री कुमार शिंदे व श्री फ्लॉवर्स, पुणे यांनी पार पाडले. या कामासाठी सुमारे १२ कामगारांनी परिश्रम घेतले.

दरवर्षी महत्त्वाच्या सण-उत्सवांच्या निमित्ताने श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात विशेष फुलांची आरास केली जाते. हिंदू नववर्षाच्या स्वागतासाठी सजलेल्या मंदिरामुळे विठुरायाचे सावळे रूप अधिकच खुलून दिसत असून, श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनाने नववर्षाची सुरुवात करण्यासाठी हजारो भाविक श्री क्षेत्र पंढरपूरात दाखल झाले आहेत. पहाटेपासूनच नाम गजराने मंदिर परिसर भक्तिमय वातावरणात दुमदुमून गेला आहे.

## डॉ. आंबेडकर जयंती उत्सव कमिटी आरळी (बु.) च्या अध्यक्षपदी राहुल सोनवणे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ववागारी/एस.के.गायकवाड : डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटी आरळी (बु.) ता.तुळजापूर च्या अध्यक्षपदी येथील युवा कार्यकर्ते राहुल भीमराव सोनवणे यांची एकमताने निवड करण्यात आली.

भारतीय घटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्ताने तुळजापूर तालुक्यातील भीमगर्जना तरुण मंडळ आरळी (बु) ची एक महत्वपूर्ण बैठक संपन्न झाली असून या बैठकीमध्ये विविध विषयावर चर्चा करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मोठ्या आनंदाने व विविध उपक्रमाने साजरा करण्याचे ठरले.यावेळी सर्वानुमते चर्चा करून डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव कमिटीची निवड करण्यात आली ती पुढील प्रमाणे अध्यक्ष राहुल सोनवणे,उपाध्यक्ष राम साबळे, खजिनदार विलास सोनवणे, मिरवणूक प्रमुख किरण गायकवाड, दिगंबर गायकवाड,रवीसोनवणे, लखन साबळे, तेजस सोनवणे, गणेश बनसोडे, नेताजी सोनवणे, आदींची एकमताने निवड करण्यात आली. महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५व्या जयंतीनिमित्ताने निळ्या ध्वजाचे ध्वजारोहण समाज प्रबोधनपर भीम गीत गायन,व्याख्यान सह विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून गावातून मुख्य रस्त्यावरून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढून या जयंती उत्सवाची सांगता करण्यात येणार असल्याची माहिती जयंती उत्सव कमिटीचे अध्यक्ष राहुल सोनवणे यांनी दिली.याप्रसंगी भीमगर्जना तरुण मंडळाचे सर्व सदस्य पदाधिकारी,ग्रामस्थ उपस्थित होते.

## निफाड मध्ये सिम्बॉल ऑफ नॉलेज फाउंडेशन आयोजित क्रिकेट स्पर्धा उत्साहात संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : सिम्बॉल ऑफ नॉलेज फाऊंडेशन आयोजित बु. श्रीकांत ज्ञानदेव निकाळे यांच्या स्मरणार्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकर चषक ११मार्च ते १५ मार्च रोजी (क्रिकेट स्पर्धा) चषक यशस्वी पार पडल्या.

१ गाव १ संघ असा सामना आयोजित केला होता कार्यक्रमाचे आयोजन.. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राकेश निकाळे ,सचिव प्रेम वाघ, सरचिटणीस विक्रम आढाव, खजिनदार विनोद गायकवाड, सहसचिव प्रवीण कोळी, सदस्य योगेश गायकवाड व सुनील साळवे यांनी केले असून उमेश मोजड व मोहित कर्डीले व पॉवर हाऊस मैदान कमिटी यांनी या स्पर्धेसाठी सहकार्य केले.. या स्पर्धेत १६ गावचे संघानी सहभाग घेतला असुन त्यासाठी आयोजक राकेश निकाळे व समितीने बक्षीस ठेवले होते..या स्पर्धेत प्रथम क्रमांक स्वामी समर्थ निफाड संघ विजयी झाला असून त्यांना २१००० रू, रोख व ट्रॉफी देण्यात आली,तर द्वितीय क्रमांक ओझर संघ विजयी झाला त्यांना १५०००रू रोख व ट्रॉफी देण्यात आली तृतीय क्रमांक पिंप्री संघ विजयी त्यांना ९०००रु. रोख व ट्रॉफी देण्यात आली.तसेच चतुर्थ पारितोषिक निफाड एम सी सी संघ विजयी झाला त्यांना४००० रोख व सन्मानचिन्ह देण्यात आले तसेच सर्व सहभागी संघांना सन्मानचिन्हे देऊण सन्मानित करण्यात आले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राकेश निकाळे यांनी मनोगत व्यक्त केले असून व राकेश निकाळे सचिव प्रेम वाघ तसेच निखिल निकाळे व सात्विक निकाळे यांच्याकडून सर्व विजयी संघाला बक्षीस व ट्रॉफी देण्यात आले याप्रसंगी चारही संघांचे संघनायक व सर्व खेळाडू संस्थेचे सर्व पदाधिकारी पावर हाऊस मैदान सर्व कमिटी सदस्य व प्रेक्षक उपस्थित होते.

## अकलूज पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक कार्यालयाचे इमारतीचा भव्य लोकार्पण सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : अकलूज पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक कार्यालयाच्या इमारतीचे नूतनीकरण करण्यात आलेल्या भव्य प्रशासकीय इमारतीचा लोकार्पण सोहळा.

शिवप्रसाद उद्योग समूहाचे अध्यक्ष शरद बापू मोरे यांच्या शुभहस्ते सत्यनारायण महापूजेने अकलूज पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक कार्यालयाचे नूतनीकरण गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर लोकार्पण सोहळा पार पडला.

नवीन वास्तुत अधिक तत्परतेने लोकसेवा बजावण्याचा संकल्प अकलूज पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नीरजोबाळे यांनी पोलीस दलाच्या वतीने व्यक्त केला.

यावेळी पोलीस स्टेशनचे सर्व पोलीस निरीक्षक उपनिरीक्षक व सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## मुंबईत समाज विकास क्रांती पक्षाचे संघटन मजबूत करण्यासाठी मोहीम वेगात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : समाज विकास क्रांती पक्षाने मुंबईत आपली संघटनात्मक पकड मजबूत करण्यासाठी विशेष मोहीम सुरू केली असून, या पार्श्वभूमीवर पक्षाकडून पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीला वेग देण्यात आला आहे.



या धोरणा अंतर्गत विशाल सिंह यांची दक्षिण मुंबई जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच मुनीम जायसवाल यांची पक्षाच्या राष्ट्रीय सचिवपदी निवड करण्यात आली आहे. उत्तर प्रदेश आणि दिल्लीप्रमाणेच मुंबईतही पक्षात महत्त्वाच्या जबाबदाऱ्या देण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक सिंह यांनी सांगितले की, संघटन विस्तारासाठी पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीची ही प्रक्रिया पुढेही सुरू राहणार आहे.

यावेळी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करत त्यांना शुभेच्छा दिल्या. विशाल सिंह आणि मुनीम जायसवाल हे आपल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडत पक्षाची वाढ आणि संघटन अधिक बळकट करण्यासाठी कार्य करतील, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. या कार्यक्रमाला रवि यादव, विनोद सिंह, आजम यांसह इतर कार्यकर्ते उपस्थित होते. सर्वांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे स्वागत करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### कारवाई न झाल्यास आंदोलन छेडणार: गणेश पाटील

## तुळजा भवानी मंदिर व्ही.आय.पी. पास वाटपावर प्रश्नचिन्ह

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानांमध्ये गेले दोन ते तीन वर्षापासून सुरू असलेल्यातखझ पास वाटपाचा कठीण गैरप्रकार बाबत आता गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. या संदर्भात अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीच्या वतीने शासन व प्रशासनाला निवेदन सादर करण्यात आले असून या निवेदनातून समितीचे पदाधिकारी गणेश पाटील यांची स्वाक्षरी असल्याची नमूद करण्यात आली आहे.



निवेदनानुसार मंदिराततखझ पास देताना नेमाचे पायामल्ली होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे काही विशिष्ट व्यक्तींनाच प्राधान्य देततखझ व्हीआयपी पास वाटप केले जात असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे सर्वसामान्य भाविकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून मंदिर प्रशासनाच्या पारदर्शकतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत.

संघटनेच्या म्हणण्यानुसार मंदिर संस्थांनी शासनाने ठरवलेल्या नियमानुसारचतखझ पाच संदर्भात संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक नियमबद्ध करण्याची मागणी करण्यात आली आहे.

तक्रार निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे. की मंदिरातील काही अधिकाऱ्याकडूनतखझ पास वाटपात अनियमितता होत असल्याने दिसून येत आहे या प्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांवर योग्य ती चौकशी करून कठोर कारवाई करण्यात यावी अशी ठाम भूमिका संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

याशिवाय आतापर्यंत झालेल्यातखझ पास वाटपात अनिमेय चा होत असलेली दिसून येत आहे ह्या प्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यावर योग्य ती चौकशी करून कठोळे कारणे द्यावी अशी ठाम भूमिका संघटने घेतली आहे याशिवाय आतापर्यंत झालेल्यातखझ पाच वाटपाची सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्या वर कायद्याच्या चौकटीत राहून कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे तसेच मंदिर समन्वय जनसंपर्क अधिकारी (पी आर ओ) व सुरक्षा यंत्रणेची भूमिका ही तपासण्याची गरज असल्याचे निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

महत्वाचे म्हणजे जर १५ दिवसाच्या आत या प्रकरणात कोणताही ठोस कारवाई झाली नाही तर संबंधित संघटनेच्या वतीने मंदिर कार्यालयासमोर ठेवून आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. दरम्यान या निवेदनाची दखल जिल्हाधिकारी व तहसीलदार तसेच मंदिर संस्थान प्रशासनाने योग्य ती पावले उचलावी अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. संपूर्ण प्रकरणाची निपक्ष चौकशी होऊन भाविकांना न्याय मिळावा याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## संजय नागटिळक यांचे निधन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील कौठाळी येथील आटयापाटया चा राष्ट्रिय खेळाडू संजय शिवाजी नागटिळक (४१)यांचे १९ मार्च रोजी दुःखद निधन झाले.त्यांच्या पच्यात वडील,पत्नी,एक मुलगा,एक मुलगी,एक भाऊ असा परिवार आहे.कौठाळी येथील वैकुंठभूमीत त्यांच्या वर अंत्यसंस्कार करण्यात आले.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात गुढीपाडवा सण उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : चैत्र शुध्द १ हा हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे नवीन वर्षारंभाचा दिवस आहे. नवीन वर्षानिमित्त श्री विठ्ठल रूक्मिणी मातेस नवीन महा-वस्त्रे परिधान करण्यात आली. मंदिरात सकाळी मंदिर समितीचे व्यवस्थापक संदेश भोसले यांच्या शुभहस्ते ध्वज पुजन करण्यात आले. यावेळी मंदिर समितीचे लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख संजय कोकीळ, अतुल बक्षी, सहाय्यक विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी, प्रसाद दशपुत्रे व कर्मचारी उपस्थित होते. याशिवाय, श्री संत नामदेव पायरीवरील (महाद्व-ारावरील) गोपूर, श्री रुक्मिणी उत्तरद्वार गोपुर, या ठिकाणी विधिवत पूजा करून ध्वज लावण्यात आले. सकाळी पंचांग पूजन करण्यात आले. मंदिर समितीचे पुजारी वेद शास्त्र संपन्न समीर कौलगी यांनी पंचांग वाचन केले. या दिवसापासून श्रीं चे महानैवेद्यामध्ये



श्रीखंड वापरण्यास सुरवात करण्यात येणार आहेत.

**श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आकर्षक फुलांची सजावट**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व गाभाऱ्यात विविध रंगीबेरंगी फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली असून, या सजावटीसाठी पिंक डेझी २५० बंडल, व्हाइट शेवंती ८०० काडी, गुलाब ५० बंडल, कामिनी ३०० बंडल, जिप्सो २० बंडल, जनाडो पत्ता ३० बंडल, आर्किड १० बंडल, झेंडू ७० किलो, शेवंती २० किलो, अस्टर २० किलो तसेच अशोक पाला २० माळांचा वापर करण्यात आला आहे. सदर फुलांची सजावट विठ्ठल भक्त नानासाहेब दिनकरराव पाचुंदकर पाटील (रा. रांजणगाव महागणपती) यांनी सेवाभावी तत्त्वावर मोफत केली असून, सजावटीचे काम डेकोरेटर्स श्री कुमार शिंदे व श्री फ्लॉवर्स, पुणे यांनी पार पाडले. या कामासाठी सुमारे १२ कामगारांनी परिश्रम घेतले.

**अन्नछत्रात वर्धापन दिनांनिमित्त विशेष भोजन प्रसाद**

हिंदू धर्मात अन्नदानाचे महत्व अनन्य साधारण आहे. विशेषतः तीर्थक्षेत्री अन्नदान केल्याने महत्पुण्य लाभते अशी भावना आहे.

मंदिर समितीचे श्री संत तुकाराम भवन येथे विनामूल्य अन्नछत्र सुरू असून, या अन्नछत्राचा सन १९९६ पासून गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर प्रारंभ करण्यात आला आहे. आज अन्नछत्राचा वर्धापन दिन असल्याने विशेष भोजन व्यवस्था करण्यात आली होती. या अन्नछत्रामध्ये दु.१२.०० ते २.०० व रा.७.०० ते ९.०० या वेळेत मोफत पोटभर भोजनप्रसाद भाविकांना उपलब्ध करून देतो, त्याचा दैनंदिन २५०० ते ३००० भाविक प्रस-ादाचा लाभ घेतात. आज वर्धापन दिनांनिमित्त भाविकांना बटाटा भाजी, भात-वरण, श्रीखंड पुरी, भजी, पापड इत्यादी भोजन प्रसाद वाटप करण्यात आला. या अन्नछत्राची जबाबदारी विभाग प्रमुख विनोद पाटील यांना देण्यात आली असून, यां अन्नछत्रामध्ये अन्नदान करण्यासाठी विविध योजना असून इच्छुक भाविकांना कार्यालयात संपर्क करून अधिक माहिती जाणून घेता येईल.

**श्री विठ्ठल रूक्मिणी मातेस अलंकार**

श्री विठ्ठल रूक्मिणी मातेस दुपारच्या पोषाखावेळी अलंकार परिधान करण्यात आले होते. श्री विठ्ठलास सोने पगडी, कौस्तुभ मणी, हि-याचा कंगन जोड, दंडपेट्या जोड मोठा, नाम निळाचा, मोत्याचा तुरा, मोत्याची कंठी, लहान शिरपेच, नवरत्नाचा हार, तोडे जोड, तुळशीची माळ, मत्स्य जोड, पितांबर व ठुशी तसेच श्री रूक्मिणीमातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळ, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, लक्ष्मीहार, सरी व कंबरपट्टा इत्यादी अलंकार परिधान करण्यात आले. याशिवाय, श्री विठ्ठलास रेशमी सो-हळे - अंगी व श्री रूक्मिणीमातेस नऊवारी रेशमी साडीचा पोषाख करण्यात आला आहे. त्यामुळे श्रींचे रूप अधिकच खुलून दिसत आहे. श्री विठ्ठल रूक्मिणी मातेचे हे मनमोहक रूप पाहण्यासाठी व दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती.

**श्री विठ्ठल व रुक्मिणी मातेच्या चंदनउटी पूजेस प्रारंभ**

ग्रीष्मऋतूतील वाढत्या उन्हापा-सून श्रीविठुरायाला शीतलता मिळावी, यासाठी दरवर्षी चैत्र पाडव्यापासून मृग नक्षत्राने पावसाळ्याची सुरुवात होईपर्यंत दररोज चंदनउटी पूजेची परंपरा आहे. त्यानुसार यंदाच्या या पूजेला गुढीपाडव्यापासून सुरुवात होत आहे, या चंदनउटी पूजेची नोंदणी ऑनलाईन पद्धतीने करण्यात आली आहे.

**भाविकांची दर्शन रांगेत गर्दी**

हिंदू नववर्षाच्या निमित्ताने मंदिर परिसरात व दर्शन रांगेत भाविकांची म-ोठ्या प्रमाणात गर्दी झाली आहे. मंदिर समितीमार्फत भाविकांसाठी आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून, गर्दी लक्षात घेता भाविकांचे जलद व सुलभ दर्शन व्हावे यासाठी व्हीआयपी दर्शनावर निर्बंध, पूजेची संख्या कमी करणे, कामांडोज नियुक्ती आदी उपाययोजना करण्यात आल्या होत्या. याशिवाय, दर्शन रांगेत तात्पुरत्या स्वरूपात बॅरिकेटिंग, मॅट, पिण्याचे पाण्याची व्यवस्था व इतर अनुषंगिक सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. हिंदू नववर्षाच्या स्वागतासाठी सजलेल्या मंदिरामुळे विठुरायाचे सावळे रूप अधिकच खुलून दिसत असून, श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनाने नववर्षाची सुरुवात करण्यासाठी हज-ारो भाविक श्रीक्षेत्र पंढरपुरात दाखल झाले होते. पहाटेपासूनच नाम गजराने मंदिर परिसर भक्तीमय वातावरणात दुमदुमून गेला होता.

# महाराष्ट्र एनजीओ महासंघ - जाहीर आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : आज आपण सर्वजण आपल्या-आपल्या संस्थांमार्फत विविध क्षेत्रांत मोलाचे सामाजिक कार्य करत आहोत. मात्र, सामाजिक क्षेत्रात कार्य करताना आपल्याला अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. संस्था स्थापन करणे कदाचित सोपे असू शकते, परंतु ती टिकवणे आणि प्रभावीपणे चालवणे दिवसेंदिवस अधिक कठीण होत चालले आहे. योग्य मार्गदर्शनाचा अभाव आणि शासनाकडून अपुरे पाठबळ मिळाल्यामुळे राज्यातील अनेक संस्था बंद पडण्याच्या मार्गावर आहेत किंवा आधीच विसर्जित झाल्या आहेत.

सीएसआर (कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) निधी मिळवण्यासाठी अनेकदा शिफारसींची आवश्यकता भासते, ज्यामुळे खऱ्या अर्थाने पात्र आणि गरजू संस्थांना आवश्यक मदत मिळत नाही. तसेच, सीएसआर निधीव्यतिरिक्त महिला व बाल विकासासाठी असलेल्या विविध शासकीय योजना, आरोग्यविषयक उपक्रम (कॅन्सरशी संबंधित सहाय्यासह) तसेच इतर सामाजिक कल्याण योजनांमधील निधीही अनेक प्रामाणिक संस्थांना सहज उपलब्ध होत नाही. याशिवाय, एनजीओ क्षेत्रात कार्य करणाऱ्या पदाधिकाऱ्यांवर अनेकदा अन्याय होतो; परंतु त्यांच्या समस्या मांडण्यासाठी आणि त्यावर योग्य तो पाठपुरावा करण्यासाठी कोणतेही अधिकृत व्यासपीठ किंवा शासकीय महामंडळ उपलब्ध नाही.

या सर्व अडचणींवर मात करण्यासाठी आणि महाराष्ट्रातील एनजीओंच्या हितसंरक्षणासाठी आम्ही महाराष्ट्र एनजीओ महासंघ स्थापन करत आहोत. शासनाकडे महाराष्ट्र एनजीओ महामंडळ स्थापन करण्याची मागणी करणे आणि संस्थांच्या कल्याण व संरक्षणासाठी सातत्याने कार्य करणे हा आमचा मुख्य उद्देश आहे.

आमची विनंती:

आपल्या संस्थेच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि हक्काच्या प्रतिनिधित्वासाठी आपण या महासंघात सहभागी व्हावे, ही विनंती. आपण सर्वजण एकत्र आलो तर आपल्या समस्या अधिक प्रभावी आणि ठोसपणे मांडता येतील.

सभासद होण्यासाठी खालील क्रमांकावर संपर्क साधा:

महाराष्ट्र एनजीओ महासंघ

संपर्क क्रमांक: ७६६६२२८३८३ / ९९२०२२९५५० / ९३२२३१३९०५

चला, सामाजिक क्रांतीसाठी एकत्र येऊया!

आपला नम्र,

महाराष्ट्र एनजीओ महासंघ

# डॉ. विशाल शेवाळे यांचा नागेश फाटे यांच्या हस्ते सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : डॉ. विशाल बाळासाहेब शेवाळे यांची डीएम हृदयरोगतज्ज्ञ या उच्च वैद्यकीय शिक्षणासाठी केआयएमएस कराड येथील मेडिकल क्षेत्रातील नामांकित विद्यापीठात निवड झाल्याबद्दल राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष उद्योग, व्यापार विभागाच्या वतीने प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांच्या हस्ते सत्कार करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांनी डॉ.विशाल बाळासाहेब शेवाळे यांना आपल्या मेहनत, समर्पण आणि जिद्दीमुळे मिळा-लेलं हे यश निश्चितच प्रेरणादायी आहे. आपल्या पुढील वैद्यकीय सेवेतून अनेक रुग्णांना नवजीवन मिळो ही अपेक्षा व्यक्त करत त्यांना शुभेच्छा दिल्या.



यावेळी पळशीचे माजी सरपंच बाळास-ाहेब शेवाळे,डॉ. मोहन शेवाळे, हनुमंत शेव-ाळे ,निवास शेवाळे, मंगेश शेवाळे ,सर्जेराव मासाळ, अमोल यलमार, डॉ. रमेश फाटे, उमेश फाटे, शुभम फाटे, शशांक फाटे उप-स्थित होते.

# डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते प.पू. जन्मेजय शरणजी महाराज व नानजीभाई ठक्कर यांचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जुन्नर : डुंबरवाडी येथे माळशेज नागरी सहकारी पतसंस्था शाखेचे नवीन जागेत स्थलांतरित उद्घाटन उत्साहात पार पडले.

या प्रसंगी प.पू. जन्मेजय शरणजी महाराज (अयोध्या) व समाजसेवक नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांची प्रमुख उपस्थिती होती. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते म-ान्यवरांचा श्रीराम मूर्ती, शाल, श्रीफळ, पेढे तसेच खारीक-खोबऱ्याचा हार देऊन सत्कार करण्यात आला.. प्रभु श्रीराम मूर्ती व तुकाराम महाराज पगडी विना देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला यावेळी तुकाराम महाराज गाथा मंदिर देवस्थान संस्थापक अध्यक्ष हरिभक्त परायण पांडुरंग महाराज घुले.महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव योगी केशव बाबा चौधरी.माळशेज नागरी



पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष हरिभक्त परायण चंद्रकांत महाराज डुंबरे.नयनाताई डुंबरे नामवंत उद्योजक अतुल नवले..

कार्यक्रमास नागरिकांची चांगली उपस्थिती लाभली असून, नवीन शाखेमुळे परिसरातील नागरिकांना पतसंस्थेच्या सेवा अधिक सोयीस्करपणे उपलब्ध होणार आहेत.

# खोदला येथील विराज लांडगे याचे नवोदय विद्यालय प्रवेश परिक्षेत दैदिप्यमान यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खोंदला येथील विद्यार्थी विराज विकास लांडगे याने नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत दैदिप्यमान यश मिळवत ९७५०% गुण मिळवले आहेत. या उत्कृष्ट कामगिरीमुळे त्याची पहिल्याच यादीत निवड झाली असून ओव्हरऑल क्रमवारीत त्याने १५ वा क्रमांक पटकावला आहे.



ग्रामीण भागातील साध्या शाळेत शिक्षण घेत असतानाही विराजने आपल्या जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. त्याच्या या यशामुळे खोंदला गावासह संपूर्ण कळंब तालुक्यात आनंदाचे वातावरण पसरले आहे.

विराजच्या या यशाबद्दल शाळेतील शिक्षक, मुख्याध्यापक तसेच गावकऱ्यांनी त्याचे कौतुक केले आहे. या यशाचे श्रेय त्याने आई-वडील, शिक्षक आणि मार्गदर्शकांना दिले. भविष्यातही उच्च शिक्षण घेउन देशसेवा करण्याचा त्याचा निर्धार असल्याचे त्याने सांगितले. या निकालामुळे विराज लांडगे याचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

**पहिल्या यादीत निवड, राज्यात १५ वा क्रमांक; ९७५०% मिळवले गुण**

**'वैनतेय' कब-बुलबुल पथकाचा चिमणी संवर्धनाचा संदेश**

**'जागतिक चिमणी दिन विशेष'**

# निफाडला चिमण्यांसाठी पाण्याच्या बाटल्यांतून साकारले आकर्षक फिडर



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : कधी काळी आपल्या चिवचिवाटाने माणसाचं भावविश्व समृद्ध करणाऱ्या चिमण्यांची घटती संख्या ही पर्यावरणासाठी धोक्याची घंटा असून, वाढते शहरीकरण, सिमेंटची घरे, मोबाईल टॉवर मधून निघणाऱ्या घातक लहरी, पिकावर किटकनाशकांचा होणारा अतिवापर, बेसुमार वृक्षतोड यामुळे चिमणीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. निसर्ग साखळीतील चिमणीचे महत्वाचे स्थान अधोरेखीत करीत जागतिक चिमणी दिनाचे निमित्ताने निफाड येथील वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर शाळेतील कब-बुलबुल पथकातील विद्यार्थ्यांनी चिमण्यांसाठी आकर्षक फिडर तयार करून 'चिमणी वाचवा पर्यावरण वाचवा' संदेश दिला.

**पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी निसर्गातील प्रत्येक घटकाला जपणे गरजेचे आहे. प्रत्यक्ष कृतीतून टाकाऊ वस्तूंचा कल्पकतेने वापर करून चिमण्यांच्या दाणा-पाण्याची सोय करून चिमणी संवर्धणासाठी चिमकल्यांनी राबविलेला उपक्रम कौतुकास्पद आहे. आपण सर्वांनी चिमणी वाचवण्याच्या या मोहिमेत सहभागी होऊन पर्यावरणाचे रक्षण करणे गरजेचे आहे.**

**- वि. दा. व्यवहारे, अध्यक्ष**
**न्यायमुर्ती रानडे विद्याप्रसारक मंडळ, निफाड**

शाळेतील स्काऊट शिक्षक गोरख सानप यांनी पाण्याच्या वाया गेलेल्या रिकाम्या बाटल्या, जुन्या बरण्या, आईस्क्रीम व श्रीखंडाचे रिकामे डबे, तार, दोरी, रंगीत टेप यांचा वापर करून विद्यार्थ्यांकडून चिमण्यांना दाणे व पाणी ठेवण्यासाठी आकर्षक ३३१ फिडर तयार करून घेतले. शाळेच्या आवारातील झाडांवर तसेच घरातील बाल्कनी, खिडकीत, गच्चीवर फिडर ठेवून त्यात चिमण्यांसाठी दाणा-पाण्याची सोय करण्याचा संकल्प कब-बुलबुल पथकातील विद्यार्थ्यांनी केला. याप्रसंगी विद्यार्थ्यांना चिमण्यांची मनोरंजक माहिती देण्यात आली.

'स्काऊट' हा प्राणीमात्रांचा मित्र असतो हा नियम केवळ पाठांतर न करता प्रत्यक्ष आचरणात आणून आपल्या आवडत्या चिऊताईची माहिती जाणून घेत त्यांचे संरक्षण व संवर्धन करण्याची प्रेरणा तसेच समाजप्रबोधन व जनजागृती साठी चिमुकल्यांनी राबविलेल्या या उपक्रमाचे न्यायमुर्ती रानडे विद्याप्रसारक मंडळ निफाड संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष वि. दा. व्यवहारे, सचिव रतन वडघुले, विश्वस्त किरण कापसे, राजेंद्र राठी, ड दिलीप वाघावकर, राजेश सोनी, प्रभाकर कुयटे, मधुकर राऊत, विश्वास कराड, नरेंद्र नांदे निफाड पंचायत समिती शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी विलास साळी, विस्तार अधिकारी एल. के. भरसट, कैलास बोरसे, वसंत गायकवाड,केंद्रप्रमुख अनिता अहिरे मुख्याध्यापिका सुजाता तनपुरे व पालकांनी कौतुक केले.

**चिमणी वाचवण्यासाठी हे नक्कीच करता येईल..**

**'चिमण्यांना पिण्याच्या पाण्यासाठी बाल्कनीत, गच्चीवर अथवा अंगणात मातीच्या पसरट भांड्यात पाणी ठेवूया.**

**'चिमण्यांना लागणारे धान्य भांड्यात अथवा फिडर मधे झाडावर, बाल्कनीत ठेवूया.**

**'लाकडाचे, पुठ्ठ्याचे कृत्रिम घरटे तयार करून विविध ठिकाणी ठेवूया..**

**'किटकनाशकांचा अतिवापर टाळूया..**

**चिमण्या वाचवणे म्हणजे आपले पर्यावरण वाचवणे होय. चिमण्यांचा चिवचिवाट पुन्हा अंगणात आणण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेणे गरजेचे आहे.**